सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❏ वर्ष - ३ रे ❏ अंक - ७८ वा ❏ अमरावती (महाराष्ट्र) ❏ मंगळवार दि. १५ एप्रिल २०२५ ❏ संपादक - शुभांगी जोशी ❏ मुल्य - १ रु. ❏ पृष्ठ -६



सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ७८ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. १५ एप्रिल २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

# उद्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार अमरावती विमानतळाचे लोकार्पण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

गेल्या अनेक वर्षांपासून बहुप्रतिक्षेत असलेल्या अमरावती (बेलोरा) विमानतळाचे उद्या बुधवार १६ एप्रिल रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे हस्ते लोकार्पण होणार असून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे , उप मुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय मंत्री सिंधिया ,राज्यमंत्री उड्डाण, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे,सह अन्य मान्यवर उपस्थित राहणार आहेत. लोकार्पणाची तयारी जवळपास अंतिम टप्प्यात पोहचली आहे.

आठवड्यातुन सोमवार बुधवार आणि शुक्रवार असे तीन दिवस अमरावतीकरांना विमानवारी करता येणार आहे. अलायन्स एअर लाईनच्या




संकेत स्थळावर वेळापत्रक जारी करण्यात आले आहे अशी माहिती महाराष्ट्र एअर डेवलपमेंट कंपनी च्या संचालिका स्वाती पांडे व जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी शनिवारी विमानतळावर घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत दिली होती

अमरावती विमानतळ विदर्भाच्या अर्थव्यवस्था, व्यापार,पर्यटन आणि हवाई संपर्कासाठी गेम चेंजर ठरणार असून महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी उडाण योजनेंतर्गत विकसित हे विमानतळ केवळ पायाभूत सुविधा नव्हे,तर उद्योग,व्यवसाय आणि प्रवासासाठी सुवर्णद्वार ठरणार आहे

महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी अंतर्गत अमरावती विमानतळ हे राज्यातील तिसरे व्यावसायिक विमानतळ आहे.अमरावती बेलोरा विमानतळावरून पहिले उड्डाण मुंबई कडे सकाळी १०: ४५वा. वाजता होणार आहे. तर

## लोकार्पणाची तयारी अंतिम टप्प्यात




विमानतळ परिसरात पोलिसांचा तगडा बंदोबस्त लावण्यात आला आहे

### भव्य दिव्य स्टेज

अमरावती बेलोरा विमानतळ परिसरात भव्य दिव्य असा डोम उभारण्यात आला आहे तर आमंत्रित पाहुण्यासाठी सोफे,खुर्च्या व कुलर ची व्यवस्था या ठिकाणी करण्यात आली आहे सर्वीकडे फुलांची आरस हि करण्यात येत आहे.




### २४ ऑक्टोबरपर्यंतची 'तिकीट विंडो ओपन'

अमरावती मुंबई आणि मुंबई ते अमरावती या विमान प्रवासाची तिकीट विंडो अलायन्स एअरकडून खुली झाली आहे. ही तिकीट विंडो २४ ऑक्टोबरपर्यंत म्हणजेच पुढील सहा महिन्यांसाठी खुली राहणार आहे. अमरावतीसह परिसरातील प्रवाशांना अलाएन्स एअरलाइनच्या वेबसाइटवरून तिकीट बुकिंग करता येणार आहे. विमानसेवा सुरू होणार असल्याने प्रवाशांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

### पायलट प्राशिक्षण केंद्राचा होणार उद्याला शुभारंभ

विमानसेवेच्या शुभारंभासोबत याच – विमानतळ परिसरात एअर इंडियाच्या – पायलट प्रशिक्षण अकादमीचा शुभारंभ देखील उद्याला होणार आहे. – प्रशिक्षण केंद्राच्या इमारतीचे काम – सध्या सुरू आहे. ते काम लवकरच पूर्ण होईल, असे एमएडीसीच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

### मुंबई-अमरावती-मुंबई असा विमानसेवा करार

प्रादेशिक संपर्क योजना उडानअंतर्गत व्यावसायिक विमानसेवा अमरावती विमानतळाहून सुरू होत आहे. त्यानुसार आठवड्यातून तीन दिवस अमरावतीकरांना मुंबईने विमानवारी करता येईल, असे वेळापत्रक अलायन्स एअर लाइन्सने जारी केले आहे. अमरावती विमानतळावर अत्याधुनिक पायाभूत सुविधा, नेव्हिगेशन प्रणाली आणि ग्राउंड हैंडलिंगची चाचपणी चमूद्वारे झालेली आहे. अलाइन्स एअर लाइनच्या करारानुसार मुंबई–अमरावती–मुंबई अशी विमानसेवा असणार आहे.तर येत्या काळात सुरत ,पुणे,नवी दिल्ली ही विमान सेवा सुरु करण्याचे नियोजन असल्याचे सांगण्यात आले

# स्कायमेटच्या अंदाजानुसार देशात यंदाचा पावसाळा होणार दमदार

## महाराष्ट्रात पुरेसा पाऊस : सरासरीपेक्षा १०३ टक्के पावसाचा अंदाज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५नागपूर**

देशात यंदा दमदार पाऊस बरसणार असून, मान्सूनचा हंगाम सामान्य राहील, असा अंदाज स्कायमेट या हवामानविषयक अंदाज वर्तविणाऱ्या खासगी संस्थेने वर्तविला आहे. जून ते सप्टेंबर या कालावधीत देशात ८६८.८ मीलीमीटर म्हणजेच सरासरीच्या १०३ टक्के पाऊस होईल, असाही अंदाज आहे.



स्कायमेटने जाहीर केलेल्या अंदाजात मान्सूनवर विपरित परिणाम करणाऱ्या एल निनोची शक्यता नाकारली आहे. यंदाच्या मान्सूनमध्ये ला निनो कमजोर असेल, असे स्कायमेटने म्हटले आहे. ला निनो कमकुवत असल्यास आणि एल निनोचा प्रभाव नसेल, तर मान्सूनचा पाऊस जोरदार बरसत असतो. मान्सूनच्या पहिल्या टप्प्यापेक्षा दुसऱ्या टप्प्यात चांगला पाऊस होऊ शकतो, असेही स्कायमेटने म्हटले आहे. पश्चिम आणि दक्षिण भारतात चांगला पाऊस होईल. मध्य प्रदेश आणि महाराष्ट्रात पुरेसा तर पश्चिम घाटात म्हणजेच प्रामुख्याने केरळ, कर्नाटकच्या किनारपट्टीचा भाग आणि गोव्यात अधिक पाऊस होईल. उत्तरेकडील राज्ये आणि पर्वतीय भागात सरासरीपेक्षा कमी पाऊस होण्याची शक्यताही स्कायमेटने वर्तविली आहे.

जूनमध्ये देशात दीर्घकालीन सरासरीच्या ९६ टक्के म्हणजेच १६५.३ मीमी, जुलैमध्ये दीर्घकालीन सरासरीच्या १०२ टक्के म्हणजेच २८०.५ मीमी, ऑगस्टमध्ये दीर्घकालीन सरासरीच्या १०८ टक्के म्हणजेच २५४.९ मीमी आणि सप्टेंबरमध्ये दीर्घकालीन सरासरीच्या १०४ टक्के म्हणजेच १६७.९ मीमी पाऊस होण्याची शक्यता असल्याचे अंदाजात वर्तविले आहे.

### हवामान विभागाने अद्याप जाहीर केला नाही पूर्वानुमान

स्कायमेट या खासगी संस्थेने यंदाचा मान्सूनचा अंदाज जाहीर केला असला, तरी भारतीय हवामान विभागाने २०२५ मधील मान्सूनचे पूर्वानुमान अद्याप जाहीर केलेले नाही. विभागाकडून साधारणतः मे महिन्याच्या शेवटी किंवा जूनच्या सुरुवातीला अंदाज जाहीर केला जातो, परंतु या वर्षी एल निनोची स्थिती 'न्यूट्रल' राहाण्याची शक्यता असल्याचे संकेत हवामान विभागाने दिले आहेत. त्यामुळे मान्सून सामान्य राहाण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने मात्र मान्सूनबाबत आताच भाकीत करणे घाईचे ठरेल, असे स्पष्ट केले आहे.

# राज्याच्या राजकारणात तीन भिडू भूकंप घडवणार; पुण्यातून फुंकणार रणशिंग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५पुणे**

महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये एक नवी आघाडी उदयास येण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. लोकसभा, विधानसभा निवडणुकीत नवीन युत्या अन् आघाड्या पाहायला मिळाल्या आता पुन्हा एकदा सत्तेसाठी नव्हे तर, विरोधकाची ठाम भूमिका बजावण्यासाठी राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष महादेव जानकर प्रहारचे बच्चू कडू आणि स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे राजू शेट्टी एकत्र येणार आहेत.

महादेव जानकर यांच्या ५७ व्या वाढदिवसानिमित्त पुण्यात 'युवा संघर्ष निर्धार परिषद' २० एप्रिल रोजी फुले वाड्याजवळील ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले सभागृह येथे आयोजित करण्यात




आली आहे. या परिषदेला बच्चू कडू आणि राजू शेट्टी हे दोघेही उपस्थित असणार असल्याने एका नव्या आघाडीचा उदय होणार असं बोललं जात आहे.महादेव जानकर यांचा राष्ट्रीय समाज पक्ष लोकसभेला भाजपसोबत महायुतीमध्ये होता मात्र विधानसभेला आपला सन्मान केला जात नाही यावरून जानकरांनी महायुतीतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला ते स्वतंत्र लढले आणि गंगाखेडमधून रत्नाकर गुट्टे हे एकमेव त्यांच्या पक्षाचे अधिकृत उमेदवार निवडून आले. मात्र इतर ठिकाणी जाणकारांना यश मिळालं नाही. निवडणूका लढणं सोप आहे मात्र, उमेदवार निवडून आणण्यासाठी युती आघाडी करणे गरजेचे असल्याचे राज्यातील मोठ्या पक्षांनाही ठाऊक आहे. तर जानकर, राजू शेट्टी आणि बच्चू कडू आणि इतर स्वतंत्र संघटना पक्षांना एकत्र आल्याशिवाय गत्यंतर नाही हे चांगल्या प्रकारे माहिती आहे.

विधानसभा निवडणुकीत महायुतीला मोठं यश मिळाल्याने प्रमुख विरोधी पक्ष असलेले महाविकास आघाडीतील शिवसेना, राष्ट्रवादी आणि काँग्रेस यांच पुरत अवसान गेलेल आहे. फडणवीस सरकारला धारेवर धरण्यासाठी विरोधी पक्ष म्हणून हे कमी पडत असल्याची भावना जनमानसामध्ये आहे. नेमकी हीच विरोधकांची स्पेस भरून काढण्यासाठी महाराष्ट्राच्या राजकारणात एक नवा प्रयोग करण्याचा प्रयत्न कांशीरामांचे शिष्य महादेव जानकर करतील असं राजकीय जाणकारांचा मत आहे.

जनसामान्यांच्या प्रश्नावर आवाज उठवण्यासाठी आक्रमक नेत्यांची आवश्यकता असते यामध्ये करारी बाणा अन् आक्रमक चेहरे असलेले प्रहार'चे बच्चू कडू तर शेतकऱ्यांच्या प्रश्नावरून रान पेटवणारे राजू शेट्टी तर, राष्ट्रीय समाज पक्षाच्या माध्यमातून मोठा जनसंपर्क असलेले जानकर एक वेगळा राजकीय प्रयोग करून पाहत आहेत. जानकर यांच्या वाढदिवसानिमित्त जरी असलं तरी युवा संघर्ष निर्धार परिषदेच्या माध्यमातून या आघाडीची अधिकृत घोषणा होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत जानकर यांच्या म्हणण्यानुसार याबाबतची स्पष्टता त्याच कार्यक्रमात येईल, असा सस्पेन्स ठेवण्यात आला आहे.

# धनंजय मुंडेंकडे ११ मोबाईल नंबर, त्यात करुणा शर्मांकडून मोठा गौप्यस्फोट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५ बीड**

गेल्या काही दिवसापांसून करुणा शर्मा वेगवेगळ्या कारणांमुळे चर्चेच्या केंद्रस्थानी आहेत. त्यांनी याआधी माजी मंत्री यांच्यावर अनेक अरोप केले आहेत. त्यानंतर आता आवादा कंपनीची बैठक धनंजय मुंडे यांच्या निवासस्थानी झाली होती. त्यामुळे याची सखोल चौकशी करावी, अशी मागणी करुणा शर्मा यांनी केली आहे. तसेच धनंजय मुंडे यांच्याकडे एकूण ११ मोबाईल क्रमांक आहेत. या मोबाईल क्रमांकाचा




सीडीआर तपासला तर संपूर्ण कच्चाचिठ्ठा समोर येईल, असा गौप्यस्फोट करुणा शर्मा यांनी केला आहे. शर्मा यांच्या खळबळजनक दाव्यानंतर आता वेगवेगळ्या चर्चांना उधाण आले आहे.

मी कधीही माझ्या नवऱ्याची किंवा स्वत:च्या मुलाचीही पाठराखण कधीच करणार नाही. धनंजय मुंडे हे दोषी आहेत, असं मी कधीही म्हणालेली नाहीये. ते कदाचित दोषी ठरू शकतात. कारण त्यांच्या बंगल्यावरच आवादा कंपनीची बैठक झाली होती. तुम्ही याची सखोल चौकशी करावी, अशी मागणी करुणा शर्मा यांनी केली.

### मोबाईल क्रमांकाचा सीडीआर काढावा

तसेच, धनंजय मुंडे यांचे एकूण ११ मोबाईल क्रमांक आहेत. हे सर्व मोबाईल क्रमांक माझ्याकडे आहेत. या मोबाईल क्रमांकाचा सीडीआर काढावा. गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना ते ११ नंबर हवे असतील तर मी त्यांना ते देऊ शकते, असेही करुणा शर्मा म्हणाल्या.देवेंद्र फडणवीस यांनी आजपर्यंत त्यांना भेटण्यासाठी मला वेळ दिलेली नाही. मी त्यांची भेट घेणार होते. मात्र मी त्यांच्याकडे कितीवेळा वेळ मागणार? देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री आहेत. त्यांनी मला भेटण्यासाठी वेळ द्यायला हवा होता. मी धनंजय मुंडे यांच्या सर्व ११ नंबरची यादी देऊ शकते. २०२२ साली मी सीबीआयमध्येही या मोबाईल क्रमांकांची तक्रार दिली होती. या मोबाईल क्रमांकाचा सीडीआर काढा, अशी मी मागणी केली होती, अशी माहितीही त्यांनी दिली.

# नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी क्षेत्रातील मालमत्ता करावरील दंड अंशतः माफ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५मुंबई**

राज्याच्या मंत्रिमंडळ बैठकीत आज महत्त्वाचे ७ निर्णय घेण्यात आले असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत आज मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. त्यामध्ये, गृह, महसूल, नगरविकास आणि विधी आणि न्याय विभागाच्या अनुषंगाने महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे असलेल्या नगरविकास खात्यातील सर्वाधिक ३ निर्णय घेण्यात आले आहेत. ते म्हणजे, नगरपरिषदा, नगरपंचायती, औद्योगिक नगरींच्या नगराध्यक्षांना बहुमताने हटवण्याच्या तरतुदीस मान्यता देण्यात आली आहे.

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मध्ये सुधारणा. नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी क्षेत्रातील मालमत्ता करावरील दंड अंशतः माफ



करून कर वसूलीसाठी व्हावी यासाठी अभय योजना लागू करण्याचा महत्त्वाचा निर्णय देखील आजच्या बैठकीत घेण्यात आला. तर, लातूरच्या पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतनमध्ये यंदाच्या शैक्षणिक वर्ष २०१५–२६ पासून अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रम सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. उच्च व तंत्रशिक्षण विभागाने हा निर्णय घेतला आहे.

# दानवेंच्या नावाचे गाऱ्हाणे घेऊन खैरे मातोश्रीवर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५मुंबई**

शिवसेना उबाठा गटाचे माजी खासदार नेते चंद्रकांत खैरे हे उद्धव ठाकरे यांची भेट घेण्यासाठी मातोश्रीवर दाखल झालेले आहेत. छत्रपती संभाजीनगरमधील एका कार्यक्रमाला चंद्रकांत खैरे यांना निमंत्रण न दिल्याने खैरे यांनी संताप व्यक्त करत, अंबादास काड्या करतो, त्याची तक्रार मातोश्रीवर करणार असल्याचं म्हटलं होतं. त्यानंतर, आज लगेच ते मातोश्रीवर उद्धव ठाकरेंच्या भेटीसाठी पोहोचले आहेत.

मातोश्रीवर पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या भेटीला माजी खासदार खैरे पोहोचले असून आमदार अंबादास दानवे यांच्याबद्दल ते तक्रार करणार आहेत. अंबादास दानवे आणि



चंद्रकांत खैरे यांच्यात सुरू असलेल्या वादानंतर खैरे हे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेण्यासाठी मातोश्रीवर दाखल झाल्याने दोघांमध्ये नेमकं काय चर्चा होते, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

# भिडे गुरुजींना कुत्र्याचा कडकडून चावा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५सांगली**

शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे संस्थापक संभाजी भिडे गुरुजी यांच्यावर कुत्र्याने हल्ला केल्याची घटना सांगलीमध्ये घडली आहे. सोमवारी रात्री संभाजी भिडे हे एका धारकऱ्याच्या घरी भोजनाच्या कार्यक्रमासाठी गेले होते. रात्री साधारण ११ वाजता ते घराबाहेर पडले. त्यावेळी माळी गल्ली परिसरातून जात असताना एका भटक्या कुत्र्याने त्यांच्यावर हल्ला केला. या कुत्र्याने संभाजी भिडे यांच्या पायाला कडकडून चावा घेतला. यानंतर संभाजी भिडे यांना तातडीने सांगलीतील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी भिडे गुरुजी यांना २ इंजेक्शन दिलेले आहेत. आणखी ४ इंजेक्शन त्यांना देण्यात येणार आहेत. सध्या मात्र त्यांची प्रकृती ठणठणीत असल्याचं सांगण्यात आलं आहे.



सांगली शहरातल्या माळी गल्लीमध्ये काल रात्री संभाजी भिडे यांना एका कुत्र्याने चावा घेतला. अचानक कुत्र्याने हल्ला केल्याने भिडे गुरुजींच्या डाव्या पायाला दुखापत झाली आहे. या घटनेनंतर आज सकाळी महापालिका प्रशासनाला जग आली आहे. त्यानंतर आता संपूर्ण शहरात भटके कुत्रे पकडण्याची मोहीम राबवली जात आहे. या पूर्वी अनेक सामान्य नागरिकांना भटक्या कुत्र्यांनी चावा घेतलेला आहे. मात्र तरीही पालिकेने कोणतीही कारवाई इतके दिवस केलेली नव्हती. मात्र संभाजी भिडे यांना कुत्र्याने चावा घेतल्यावर जेवढ्या तत्परतेने पालिका प्रशासन कुत्र्यांना पकडत आहे, त्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये संतापाची लाट पसरली आहे.

संपादकीय ......

# बिहार निवडणुकीत भाजपचेच पारडे जड

बिहारमध्ये धार्मिक भावनापेक्षाही जातीपातींचे राजकारण आणि जातीपातीतील संघर्ष हा नेहमीच महत्त्वाचा राहिला आहे. बिहारमध्ये इतर मागासवर्गीय २७ टक्के आणि अतिमागास जाती ३६ टक्के आहेत. अनुसूचित जाती २० टक्के, तर अनुसूचित जातीजमाती २ टक्के आहेत. सवर्णांची टक्केवारी १५ टक्के आहे. जाती समूहांची वर्गवारी निवडणुकीत महत्त्वाची ठरते. यादव १४ टक्के, मुस्लीम १७.७० टक्के, राजपूत साडेतीन टक्के, भूमिहार सव्वा दोन टक्के, कुर्मी पावणेतीन टक्के, कुशवाह सव्वा टक्के, ब्राम्हण साडेतीन टक्के अशी ही वर्गवारी आहे.

राष्ट्रीय जनता पक्षाचे सर्वेसर्वा लालूप्रसाद यादव यांच्या राष्ट्रीय जनता दल पक्षाला यादव आणि मुस्लिमांचा पाठिंबा असल्याचे म्हटले जाते आणि बिहारच्या उत्तर भागात राजदची ताकद आहे. प्रामुख्याने यादव आणि मुस्लिमांच्या पाठिंब्यावर राजदने संख्याबळ टिकवलेले आहे. २०१५ मध्ये झालेल्या निवडणुकीत राजदने ८०, संजदने ७१ आणि काँग्रेसने २७ जागा जिंकल्या होत्या आणि महाआघाडीने १७८ जागा मिळवून सत्ता संपादन केली होती. त्यानंतर २०२० च्या निवडणुकीत राजदने ७५ जागा जिंकल्या. राजदला ५ जागांचा फटका बसला; पण नितीश कुमार यांच्या संजदला ४३ जागा प्राप्त होऊन त्यांच्या जागांमध्ये सुमारे २८ जागांची घट झाली. याउलट भाजपने ५३ जागांवरून ७४ जागांवर झेप घेत २१ जागा अधिक जिंकल्या. काँग्रेसच्या जागातही ८ जागांची घट झाली. २०१५ आणि २०२० या दोन निवडणुकीचा आढावा घेतला, तर संजदच्या आणि काँग्रेस पक्षाच्या जागा घटल्या, तर भाजपच्या जागा वाढल्या. राजदने स्थान जवळपास कायम ठेवले. २०२० च्या निवडणुकीत राजदने सर्वाधिक ७५ आणि त्या पाठोपाठ भाजपने ७४ जागा मिळवल्या होत्या.

लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर स्थापन झालेल्या इंडिया आघाडीचे निमंत्रक पद आपल्याकडे येईल, ही नितीश कुमार यांची अपेक्षा होती; पण ती पूर्ण झाली नाही. ते इंडिया आघाडीतून बाहेर पडले. त्यांचाच कित्ता बंगालच्या मुख्यमंत्री तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी यांनी गिरवला. समाजवादी पक्षाचे सर्वेसर्वा अखिलेश यादव यांनीही तीच वाट धरली. खरे तर, नितीश कुमार यांचे काँग्रेसशी कधी सख्य नव्हतेच. भाजपशीच त्यांची प्रदीर्घ काळ दोस्ती राहिली आहे आणि आता दिवाळीनंतर होणार्या निवडणुकीत ही युती विजयाची पुनरावृत्ती करण्याची शक्यता आहे.

जबरदस्त संघटना आणि करिष्माई नेतृत्व बिहारमधील कोणत्याही पक्षाकडे नसेल एवढे जबरदस्त संघटना सामर्थ्य भाजपकडे आहे. गावागावात, शहरात, महानगरात मतदान बूथपर्यंत भाजपचे संघटन आहे आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अनुयायांचे मोठे पाठबळ भाजपला लाभलेले आहे. महाराष्ट्र आणि दिल्ली विधानसभेतील विजयामुळे भाजपमध्ये उत्साहाची लाट आहे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे करिष्माई नेतृत्व. हे नेतृत्व म्हणजे भाजपच्या यशाची गॅरंटीच म्हटली जात आहे. सुशीलकुमार मोदी यांच्या निधनानंतर दिलीप जयस्वाल यांच्याकडे प्रदेशाध्यक्षपदाची सूत्रे देऊन भाजपने नवा चेहरा पुढे आणला आहे. जयस्वाल वैश्य समाजाचे आहेत. हा समाज नेहमीच भाजपचा पाठीराखा राहिला आहे. वैश्य समाजासह सवर्ण समाजही भाजपसोबत आहे आणि नितीश कुमार यांच्यामुळे कुर्मी, कोईरी, कुशवाह, अतिमागास जातीही भाजपसोबत राहतील असे चित्र आहे.नितीशकुमार यांनी राज्यात कडक दारूबंदीचे धोरण अंमलात आणले आहे. दारूबंदीमुळे सर्व जाती समूहातील महिला नितीश कुमार यांच्याविषयी सहानुभूती बाळगून आहेत. त्याचाही लाभ संजदसोबत भाजपलाही होऊ शकतो.भाजपचे संघटनेचे जाळे जबरदस्त आहे. नितीश कुमार यांच्या संजदलाही जनाधार आहे आणि लालू, तेजस्वी यादव यांच्या राजदचेही जनमानसातील स्थान भक्कम आहे. तथापि, काँग्रेसची संघटनात्मक अवस्था जर्जर आहे. किंबहुना पक्षाची संघटनाच शिल्लक राहिलेली नाही. एकेकाळी स्वबळावर बिहारमध्ये सत्ता स्थापन करणार्या काँग्रेसची स्थिती विकलांग झालेली आहे. राजदच्या मदतीने त्यांना थोड्याफार जागा मिळतील; पण राज्याच्या राजकारणावर प्रभाव टाकावा, एवढे सामर्थ्य या पक्षाकडे राहिलेले नाही. जवाहरलाल नेहरू विद्यापीठात विद्यार्थी नेता म्हणून चमकलेले कन्हैया कुमार यांच्याकडे पक्ष संघटनेची सूत्रे दिली आहेत. राहुल गांधी प्रचार सभा घेतील. प्रियांका गांधी याही काही प्रचार सभा पार पाडतील; पण पंतप्रधान मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यासह भाजप नेत्यांच्या सरबत्तीपुढे काँग्रेसच्या प्रचार सभा किती टिकाव धरतील, हा प्रश्नच आहे. निवडणूक रणनीतीकार प्रशांत किशोर यांनी जनसुराज पक्ष स्थापन केला आहे आणि तेही रिंगणात उतरणार आहेत. यादवांच्या मुस्लीम व्होट बँकेवर त्यांची नजर आहे. हा पक्ष सध्या तरी प्रभावी नाही; पण या पक्षामुळे मुस्लीम मतांचे विभाजन झाले, तर ते भाजपच्या पथ्यावरच पडेल. ओवैसी यांच्या एमआयएममुळे होणारी मुस्लीम मतविभागणीही भाजपला पूरक ठरू शकते. भाजपच्या झंझावाताला राजद काही प्रमाणात तोंड देऊ शकेल.

# अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाची जिल्हास्तरीय बैठक उत्साहात

## दोन दिवसीय पत्रकारांचे राज्यस्तरिय खुले अधिवेशन ३ व ४ मे २०२५ रोजी भद्रावती ला होणार



विदर्भ प्रजासत्ताक

**दि.१५अमरावती–** अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाची जिल्हास्तरीय बैठक ९ एप्रिल रोजी दुपारी २ वाजता जिल्हा परिषद विश्रामगृह,मालटेकडी, अमरावती येथे अ.भा.ग्रा.पत्रकार संघाचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष मनोहर सुने यांच्या अध्यक्षतेखाली व महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष कैलास बापू देशमुख, राष्ट्रीय कार्याध्यक्ष युसूफ खान यासीन खान,राष्ट्रीय उपाध्यक्ष राजेंद्र भुरे,प्रदीप जोशी, राष्ट्रीय सचिव अशोक पवार,केंद्रीय संपर्क प्रमुख प्रा.रवींद्र मेंढे,महाराष्ट्र प्रदेश सल्लागार अरुण कुलथे,कार्यालय प्रमुख बाबाराव खडसे यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात संपन्न झाली.

कार्यक्रमाच्या सुरूवातीला अमरावती महानगर अध्यक्ष किशोर बरडे यांच्या मातोश्री स्व लिलाबाई बाबाराव बरडे,अमरावती जिल्हाध्यक्ष सुधाकर टिपरे यांच्या मातोश्री स्व.लिलाबाई टिपरे,पत्रकार अरूण कुलथे यांच्या पत्नी स्व.अनुराधा कुलथे,अ.भा. ग्रा. पत्रकार संघाचे केंद्रीय संघटक स्व.संजय कदम व धामणगाव रेल्वे पत्रकार बोधीसत्व काळे यांचे चिरंजीव स्व.श्रध्देय काळे यांचे दु:खद निधन झाले.त्यांना संघटनेच्या वतीने भावपूर्ण श्रध्दांजली वाहण्यात आली.

अ.भा.ग्रा.पत्रकार संघाच्या वतीने यावर्षी दोन दिवसीय राज्यस्तरीय पत्रकाराचे खुले अधिवेशन ३ व ४ मे २०२५ रोजी चंद्रपूर जिल्हयातील भद्रावती येथे आयोजित करण्यात आले आहे. या संदर्भात सविस्तर मार्गदर्शन महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष कैलासबापू देशमुख यांनी प्रास्ताविकपर भाषणातून केले. तसेच हे अधिवेशन सर्व पत्रकारांकरीता खुले राहणार असुन महाराष्ट्र राज्यातील सर्व पत्रकार बंधू-भगिणींनी या अधिवेशनाला उपस्थित राहावे असे आवाहन यावेळी त्यांनी केले. अमरावती जिल्हाध्यक्ष सुधाकर टिपरे व भूषण यावले, प्रा.रवींद्र मेंढे,केंद्रीय कार्याध्यक्ष युसूफ खान यांसह संघटनेच्या इतर पदाधिकारी व सदस्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी महिला मंच महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस पदी कांचन मुरके यांची नियुक्ती

तसेच पत्रकार संघाच्या अमरावती महानगर अध्यक्षपदी किशोर बरडे यांची नियुक्ती करण्यात आली. त्यांचा सन्मान संघटनेचे अध्यक्ष मनोहर सुने व अन्य पदाधिकाऱ्यांनी केला. तसेच पत्रकार संघाचे अमरावती महानगर कार्यकारिणी,अमरावती तालुका, भातकुली तालुका, दर्यापूर तालुका,अंजनगाव सुर्जी तालुका, चांदूर रेल्वे तालुका कार्यकारिणी घोषित करून नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे राष्ट्रीय अध्यक्ष मनोहर सुने व इतर राष्ट्रीय कार्यकारिणी चे पदाधिकारी यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले.तसेच जेष्ठ पत्रकार तथा केंद्रीय सचिव अशोक पवार यांचा वाढदिवसानिमित्त मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ देवून सन्मान करण्यात आला.

अध्यक्षीय भाषणातून पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष मनोहर सुने यांनी पत्रकार संघटनेच्या कार्यप्रणालीची सविस्तर माहिती देऊन पत्रकार संघाने ग्रामीण पत्रकाराच्या समस्या शासन दरबारी मांडून त्या सोडविल्याचे सांगीतले.

या बैठकीचे सूत्रसंचालन कांचन मुरके यांनी केले. तर आभार पत्रकार संघाचे कार्यालय प्रमुख बाबाराव खडसे यांनी केले.यावेळी अ.भा.ग्रा.पत्रकार संघाचे विदर्भ प्रदेश सरचिटणीस सचिन ढोके, अमरावती जिल्हाध्यक्ष (पश्चिम) सुधाकर टिपरे, अमरावती जिल्हाध्यक्ष (पूर्व) भूषणभाई यावले, सुरेशसिंग मोरे, ,अमरावती महानगर अमरावती तालुका,दर्यापूर तालुका अंजनगाव सुर्जी, तालुका भातकुली,तालुका चांदूर रेल्वे तालुका येथील अध्यक्ष व सर्व पदाधिकारी,सदस्य यांच्यासह अमरावती जिल्ह्यातील अनेक पत्रकारांची उपस्थिती होती.

# केळी पिकात आंतरपीक म्हणून तिळाची लागवड करा, लाखोंचं उत्पन्न मिळवा!

**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक**

महात्मा फुले कृषी विद्यापीठ द्वारा प्रसारित उन्हाळी हंगामासाठी असलेल्या फुले पूर्णा नावाच्या तीळ जातीचं बियाणे १००० एकर पेक्षा जास्त क्षेत्रावर बहारदारपणे फुललेलं आहे. काही शेतकरी बांधवांनी केळी पिकात आंतरपीक म्हणून तीळ पिकाची लागवड केली, तर काही शेतकरी बांधवांनी कापून गेलेल्या केळी पिकाच्या खोडव्यामध्ये तीळ पिकाची लागवड केली. तर काहींनी ठिंबकवर सलग तीळ पिकाची लागवड केली.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

धुळे जिल्ह्यातील पिंपरी येथील शेतकरी राजेंद्र देवसिंग राजपूत यांनी तीन एकर क्षेत्रावर केळीची लागवड केली असून यात तीळ पिकाची लागवड केली आहे. यात केळीचे लागवड दिनांक ५ फेब्रुवारी रोजी तर तीळ पिकाची लागवड १९ फेब्रुवारी रोजी केली. या शेतकऱ्याने आतापर्यंत कसे नियोजन केले आहे? केळी पिकाला कसा फायदा होतो आहे, समजून घेऊयात....

### तिळावर बीजप्रक्रिया

तीळ बियाणे लागवड करताना त्यांनी बियाणास बीज प्रक्रिया केली की, ज्यामुळे बियाणापासून व जमिनीमधून उद्भवणारे बुरशीजन्य रोग होऊ नये म्हणून बियाण्यास चार ग्रॅम ट्रायकोडर्मा पावडर प्रति किलो बियाणास चोळून लावले. त्यानंतर पेरणीपूर्वी पीएसबी लीर्श्रीीश २५ ग्रॅम प्रति किलो बियाणास बीज प्रक्रिया केली. पेरणी बैलपांबरीने ४५ x १० सेंटीमीटर अंतरावर पाणी दिलेल्या क्षेत्रात वापसा आल्यावर केली.

### पेरणी प्रक्रिया कशी केली?

पेरणी करताना बियाणे अडीच ते तीन सेंटीमीटर पेक्षा जास्त खोलीवर पडणार नाही, याची काळजी घेतली. बियाणे जास्त खोलवर पडल्यास उगवणीवर विपरीत परिणाम होईल, याची त्यांना पूर्वकल्पना होती. बियाणे तिफनने पेरताना एक किलो बियाणामध्ये मध्ये एक किलो दाणेदार खत आणि शेणखत मिश्रण करून वापरले.

त्यामुळे विशिष्ट पाहिजे असलेल्या अंतरावर पेरणी करता आली. पेरणीनंतर आठ ते दहा दिवसांनी पहिली विरळणी आणि १५ ते २० दिवसांनी दुसरी विरळणी करावी लागली. पिकाच्या योग्य वाढीसाठी व अधिक उत्पादन मिळवण्यासाठी हेक्टरी रोपांची संख्या २.२० लाख प्रति हेक्टर इतकी राहील, याची काळजी घेतली.

### खत व्यवस्थापन करताना...

खत व्यवस्थापन करताना तीळ पिकास चांगले कुजलेले शेणखत पाच टन प्रति हेक्टर त्यासोबत एरंडी पेंड एक टन आणि दहा किलो सल्फर प्रति हेक्टर कुळवणी अगोदर जमिनीत चांगले मिसळून दिलेले होते. रसायनिक खत देताना तीळ पिकास नत्र ६० किलो प्रति हेक्टर स्फुरद ४० किलो प्रती हेक्टर आणि पोटॅश २० किलो प्रति हेक्टर याप्रमाणे पेरणी करताना दिले. नत्राची अर्धी मात्रा म्हणजेच ३० किलो देण्यासाठी ६३ किलो युरिया पेरणी करताना दिले तर उर्वरित मात्रा पेरणीनंतर २१ दिवसांनी दिले. नत्राची दुसरी मात्रा दिल्यानंतर पीकास पाणी दिले. अधिक उत्पादननासाठी पीक फुलोऱ्यात अवस्थेत असताना दोन टक्के युरियाची फवारणी केलेली आहे.




शेतकरी ते थेट ग्राहक
कामधेनु नॅचरल्स
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळ, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर राठी, मो. ७७२००७७५५०

### तण नियंत्रणासाठी....

साधारणपणे सुरुवातीचा ३५ ते ४० दिवसाचा कालावधी हा स्पर्धाक्षम असल्याने सुरुवातीच्या काळात तण नियंत्रण होणे आवश्यक होते. त्यासाठी पेरणीनंतर १५ ते २० दिवसांनी पहिली कोळपणी व निंदणी, नंतर ३० ते ३५ दिवसांनी दुसरी कोळपणी व गरजेनुसार निंदनी करून पीक तण विरहित ठेवलेले आहे. तीळ पिकाची मुळे ही तंतूमुळे असल्याने जमिनीच्या वरच्या थरात वाढत असल्याने खोल अंतर मशागत केल्यास मुळांना इजा पोहोचते. यांची पूर्वकल्पना असल्याने त्यांनी खोलवरची मशागत टाळली. पीक लहान असताना अंतर मशागत करावी लागली.

### पाणी व्यवस्थापन करताना...

पाणी व्यवस्थापन करताना अत्यंत काळजी घेतलेली आहे. कारण तीळ पाण्यासाठी फारच संवेदनशीआहे. तिळाचे पीक हे पाण्याचा ताण सहन करणारे असले तरी उन्हाळी हंगामात पिकास पाण्याचा ताण पडू दिले नाही. साधारणतः जमिनीच्या मगदूराप्रमाणे बारा ते पंधरा दिवसाच्या अंतराने पाण्याच्या पाळ्या दिलेले आहेत. पिकास फुले येण्याच्या तसेच बोंडे धरण्याच्या वेळेस पाण्याचा ताण पडू नये, म्हणून विशेष काळजी घेण्यात येत आहे. तीळ पिकास उन्हाळी हंगामामध्ये पाच ते सहा पाण्याच्या पाळ्या द्याव्या लागणार आहे.

### पिक संरक्षणाच्या बाबतीत...

तीळ पिकावर प्रामुख्याने पाने गुंडाळणारी अळी, पाने खाणारी अळी व गादमाशी तसेच रस शोषण किडी, तुडतुडे कोळी व पांढरी माशी याचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून ह्या किडींच्या बंदोबस्तासाठी पहिली फवारणी ५% निंबोळी अर्काची आणि नंतर पंधरा दिवसाच्या अंतराने टींळपरश्रंहिी कीटकनाशक दोन मिलि प्रति लिटर पाणी याप्रमाणे पंधरा दिवसाच्या अंतराने फवारणी केलेली आहे.

उन्हाळी हंगामात तीळीवर प्रामुख्याने पर्णगुच्छ, मर, खोड व मुळकुज, भुरी हे प्रमुख रोग आढळून येतात. म्हणून त्यासाठी रोगाच्या नियंत्रणासाठी पेरणीपूर्वी बियाणास बीज प्रक्रिया केलेली आहे. अजून तरी प्लॉटमध्ये रोगाचा प्रादुर्भाव दिसून आलेला नाही.




# १० आयुर्वेदिक उपाय देतात निरोगी शरीर आणि संतुलित वजन; आजपासूनच करा सुरुवात!

**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक**

कोणताही आजार झटपट बरा व्हावा म्हणून आपण ॲलोपॅथीच्या गोळ्या घेतो. कारण आयुर्वेदाने लाभ मिळायला बराच वेळ लागतो हे आपण जाणतो. मात्र लक्षात घ्या, आयुर्वेदाला ४००० वर्षांचा इतिहास आहे, त्यामुळे हे शास्त्र दुय्यम न मानता दैनंदिन जीवनशैलीत त्याचा समावेश केला तर आजार होणारच नाहीत किंवा झालेल्या आजारातून कायमस्वरूपी सुटका होईल. यासाठी आयुर्वेदात सांगितलेले नियम पाळा आणि निरोगी राहा.

कांदा, आलं, लसूण, टोमॅटो, दालचिनी या पदार्थांचा दैनंदिन आहारात समावेश केल्यामुळे शरीरातील चरबी कमी होण्यास मदत मिळते.

आहारात मिठाचे प्रमाण जितके कमी करता येईल तेवढे करा. कारण मिठातील सोडियममुळे शरीरात पाण्याचे प्रमाण वाढते आणि लठ्ठपणा वाढतो.

रात्री झोपण्यापूर्वी ग्रीन टी किंवा जिरे, ओवा घालून उकळवलेले पाणी प्यायल्याने पचनक्रिया वाढते. ज्यामुळे वजन कमी होण्यास वा नियंत्रित राहण्यास मदत होते.

आहारात साखरेचे प्रमाण जितके कमी करता येईल तेवढे करा. साखरेऐवजी गूळ अथवा मधाचा वापर करू शकता.

आहारात नियमितपणे दही असेल तर शरीर निरोगी राहील.

पोटाची चरबी कमी करण्यासाठी दररोज सकाळी कच्च्या लसणाची एक पाकळी खाल्ल्यामुळे पोटाचा घेर कमी होण्यास मदत होईल.



अपुऱ्या झोपेमुळेही वजन वाढते. झोप चांगली झाली तर पचनक्रिया वाढते आणि अतिरिक्त चरबी वाढत नाही. योगा केल्याने वजन घटण्यास मदत होते. शरीर लवचिक होते.

रात्रीचे जेवण सूर्यास्तापूर्वी घेतल्यास आरोग्य उत्तम राहते.

रोज ४५ मिनिटं घाम काढत चालल्याने शरीराची यंत्रणा सुरळीत राहते.

दिवसभरात दोन ते तीन वेळा आहार घ्यावा, त्यात कच्च्या भाज्या, फळं यांचा जास्त समावेश असावा. पोटभर न जेवता भुकेचा पाव भाग शिल्लक राहील एवढाच आहार घ्यावा.

तेलकट, मसालेदार अन्नसेवन न करता सात्विक आहार घ्या, ताजे ताक प्या आणि प्रत्येक वेळी जेवणानंतर शतपावली करा.

# दर्यापूर तालुक्यात फार्मर आयडीला मिळतो प्रतिसाद

## २४ हजार शेतकऱ्यांनी काढला डिजिटल ओळखपत्र, योजनांचा लाभ घेणे होणार सोपे

**विदर्भ पराजसत्ताक**

**दि.१५दर्यापूर** – दर्यापूर तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी डिजिटल क्रांतीची नवी पहाट उगवली आहे. तालुक्यातील २४,४४८ शेतकऱ्यांनी आपला ग्रीस्टॅक फार्मर आयडी तयार केला आहे. एकूण शेतकरी संख्येच्या ४९.५३ टक्के शेतकऱ्यांनी ही नोंदणी पूर्ण केली आहे.

फार्मर आयडी हे आधारकार्डासारखेच एक महत्त्वाचे ओळखपत्र ठरणार आहे. या कार्डमध्ये शेतकऱ्यांच्या सर्व कागदपत्रांची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहे. शेतकरी आणि त्यांच्या शेतजमिनीची ओळख, पेरलेल्या पिकांची माहिती आणि क्षेत्र यांची नोंद या आयडीमध्ये असेल.

तालुक्यात एकूण ४९,३६१ शेतकरी खातेदार आहेत. सीएससी सेंटरच्या माध्यमातून फार्मर आयडीची नोंदणी केली जात आहे. यासाठी कृषी अधिकारी, तहसीलदार, मंडळ अधिकारी, ग्रामसेवक आणि सीएससी केंद्राच्या चालकांना विशेष प्रशिक्षण देण्यात आले आहे.

फार्मर आयडीमुळे शेतकऱ्यांना अनेक फायदे होणार आहेत. पीएम किसान योजनेचे अनुदान, किसान क्रेडिट कार्ड, पीकविमा, बँक कर्ज यांसारख्या सुविधा सहज मिळतील. पीक नुकसान भरपाई, एमएसपी दराने शेतमाल विक्री आणि कृषी विभागाच्या योजनांचा लाभही या आयडीद्वारे घेता येईल.तालुक्यात एकूण ४९,३६१ शेतकरी खातेदार आहेत. सीएससी सेंटरच्या माध्यमातून फार्मर आयडीची नोंदणी केली जात आहे.




फार्मर आयडी काढण्यासाठी आधारकार्ड, आधारशी संलग्न मोबाईल क्रमांक आणि सातबारा उतारा आवश्यक आहे. कृषी विभागाने उर्वरित शेतकऱ्यांना लवकरात लवकर आपला फार्मर आयडी तयार करून घेण्याचे आवाहन केले आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucngmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

मंगळवार दि. १५ एप्रिल २०२५

शहर/ग्रामिण


# नागपूरच्या जान्दू कन्स्ट्रक्शन कंपनीने ने साठविली 'ती' राख

## कारवाईचा अद्यापही पत्ता नाही : हवेत उडणाऱ्या राखेमुळे चालक, प्रवाशांना त्रास

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५नांदगाव पेठ**

महामार्गालगत लाखो टन साठविलेली ती अनधिकृत राख कुणाची असा प्रश्न गेल्या आठवड्यापासून उपस्थित केला जात आहे.हवेत उडणाऱ्या या राखेमुळे चालक आणि प्रवास्यांना त्रास होत आहे तरी सुद्धा शासन यावर कोणतीच कार्यवाही करायला तयार नाही अश्यातच राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांनी नागपूर येथील जान्दू कन्स्ट्रक्शन कंपनीला रस्ते बनविण्याचा कंत्राट दिला असून संबंधित कंपनीच्या कंत्राटदाराने ही अनधिकृत राख साठवल्याचा प्रताप केल्याचे समोर आले आहे.



महामार्गालगत लाखो टन राखेची अनधिकृतरित्या साठवणूक करण्यात आल्याचे वृत्त माध्यमांनी प्रकाशित केल्यानंतर सुद्धा अद्यापही प्रशासनाने संबंधित बांधकाम कंपनीवर कोणत्याही प्रकारची कार्यवाही केलेली नाही. हवेमुळे ही राख उडून प्रवासी व चालकाच्या डोळ्यात शिरत असून महसूल, प्रदूषण आणि प्रादेशिक परिवहन विभागाचे मात्र या गंभीर बाबीकडे हेतुपुरस्सर दुर्लक्ष होत असल्याचा आरोप होत आहे.राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांनी सुद्धा या गंभीर प्रकाराकडे दुर्लक्ष केलेले असून कंत्राटदाराला सुद्धा त्यांचे अभय असल्याचे बोलले जात आहे. गत आठवड्यात भरधाव वाहनातील राखेचे कण चालकाच्या डोळ्यात गेल्याने घडलेल्या अपघातात नाहक एका युवकाला आपले प्राण गमवावे लागले. प्रादेशिक परिवहन विभागाने एका दिवसासाठी दिखावा कारवाई करत राखेच्या ओव्हरलोड ११ वाहनांवर कारवाई केली मात्र नागपूर जिल्ह्यातील मौदा येथील एनटीपीसी या ऊर्जा प्रकल्पातून जान्दू कन्स्ट्रक्शन कंपनी ओव्हरलोड वाहनांमधून दररोज हजारो टन राखेची वाहतूक करत असून त्या वाहनांवर कोणत्याही प्रकारची कारवाई प्रादेशिक परिवहन विभागाने केली नाही. गत आठवड्यात अपघाताची घटना घडल्यानंतर महामार्गालगत रहाटगाव नजीक असलेल्या खुल्या जागेवरील अवैधरित्या साठवणूक केलेली राख हवेमुळे उडाल्याने चालकांना रस्ता सुद्धा दिसत नव्हता मात्र अनेक वाहने रस्त्याच्या कडेला थांबलेली होती.याबाबत दुसऱ्या दिवशी वृत्त प्रकाशित झाल्यानंतर देखील प्रशासनाने कोणत्याही प्रकारची दखल घेतली नाही. प्रदुषण विभाग, महसूल विभाग,पोलीस प्रशासन यांनी या गंभीर प्रकाराला वाऱ्यावर सोडून देत महामार्गावर पुन्हा अपघात होण्याची प्रतीक्षा करत आहेत तर प्रादेशिक परिवहन विभागाने एका दिवसापुरती थातुर मातूर कारवाई करून या प्रकरणांतूनतूर्तास सुटका करून घेतलेली आहे. महामार्गावर खुल्या जागेत राख ठेवल्याने अपघात होण्याची निश्चित शक्यता असून होणाऱ्या प्रदूषणामुळे अनेकांच्या आरोग्याचा प्रश्न देखील निर्माण होणार आहे. शासनाचा गलेलठ्ठ पगार घेऊन ट्रक मालक आणि व्यावसायिकांच्या हिताचे काम करणाऱ्या प्रदुषण, महसूल आणि प्रादेशिक परिवहन विभागाने अश्या गंभीर प्रकारावर आळा घातला पाहिजे अशी स्थानिकांची मागणी आहे. राखेची वाहतूक करणाऱ्या वाहनांमध्ये कारवाईनंतर सुद्धा काहीच फरक पडलेला दिसत नसून भविष्यात याविरोधात मोठे जनआंदोलन होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त युवक काँग्रेसतर्फे 'मोहब्बत का शरबत' चे वाटप




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती** – १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त युवक काँग्रेसच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी येणाऱ्या हजारो अनुयायांसाठी 'मोहब्बत का शरबत' वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात हजारो नागरिकांनी लाभ घेतला.खासदार बळवंतराव वानखडे, माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख, विदर्भ मतदारचे संपादक तसेच प्रदेश कॅंग्रेस प्रवक्ते दिलीप येडतकर साहेब, प्रदेश कॅंग्रेसचे सचिव किशोरजी बोरकर, प्रदेश कॅंग्रेस उपाध्यक्ष भैयाजी पवार, औद्योगिक सेलचे जिल्हाध्यक्ष समीर जवंजाळ या मान्यवरांच्या हस्ते शरबतचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमाद्वारे बाबासाहेबांचे विचार आणि त्यांचे समाजकार्य नवयुवकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करण्यात आला. युवक काँग्रेसतर्फे भविष्यातही असेच सामाजिक उपक्रम राबवले जातील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.यावेळी अमरावती विधानसभा युवक काँग्रेसचे अध्यक्ष वैभव देशमुख ,एनएसयुआय शहराध्यक्ष संकेत साहू, गुड्डू हमीद, सागर कलाने, सागर यादव, आशिष यादव, असलम सलाट, धनंजय बोबडे, आकाश गेडाम, संकेत भेंडे, मोहीत भेंडे, शुभम बांबल, श्रेयस धर्माळे, कृणाल गावंडे, प्रियल मोहोड, ओम कुबडे, वेदांत केने, अंकुश टोपले, निसार शेख, जुबेर खान व इतर युवक कॉंग्रेस व एनएसयुआय कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अभिवादन सोहळ्यात पुढाऱ्यांची रंगली टोलेबाजीसत्ताधारी म्हणाले, धोका नाही तर विरोधक म्हणाले संविधान धोक्यात !

## खा, बळवंत वानखडे व डॉ. सुनील देशमुख यांना पुस्तक वाचनाचा सल्ला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी एकीकडे शेकडो अनुयायी जमले होते तर दुसरीकडे बाबासाहेबांनी देशाला दिलेल्या संविधानावर जणू वादविवाद स्पर्धा रंगल्याचे चित्र अभिवादन सोहळ्यात दिसून आले. मंचावर उपस्थित सत्ताधारी संविधान सुरक्षित असल्याचे बाजूने तर विरोधक संविधान धोक्यात आहे एवढेच सांगताना दिसून आलेत. बघता बघता ही टोलेबाजी चांगलीच रंगली.डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा सौंदर्याकरण समितीतर्फे आयोजित कार्यक्रमात ही चर्चा रंगली. डॉ. बाबासाहेबआंबेडकर चौकात महामानवाला अभिवादन करण्यासाठी शेकडो अनुयायी जमले होते. जयंतीनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा सौंदर्याकरण समितीनेअभिवादन सोहळा आयोजित केला.हा सोहळा सर्वपक्षीय सर्वधर्मीय असल्याने सत्ताधारी व विरोधक दोन्ही बाजूची नेतेमंडळी मंचावर उपस्थित होती. अभिवादन सोहळ्यात प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित ॲड. दिलीप एडतकर यांनी बाबासाहेबांनी लिहिलेले संविधान धोक्यात असल्याचे सांगत हा देश आता संघराज्य म्हणून वाटचाल करत असल्याचे सांगितले तर डॉ. सुनील देशमुख यांनीसुद्धा सत्ताधारी कशाप्रकारे कायद्यांमध्ये बदल घडविण्यातमग्न आहेत, याचे उदाहरण प्रस्तुत केले, एवढेच नव्हे तर सत्ताधार्यांना जागा दाखवून द्या, असे आवाहनही त्यांनी केले. त्यामुळे मंचावरून विरोधकांना सत्ताधार्यांनी प्रत्युत्तर देण्यास सुरुवात झाली.आमदार सुलभा खोडके यांनी संपूर्ण देश हा संविधानावर चालत असून आम्हीसुद्धा सर्वधर्म समभाव मानणारे आहोत, जोपर्यंत भारत आहेत, तोपर्यंत संविधान राहणारच असे त्या म्हणाल्यात. ॲड. दिलीप एडतकर यांच्या व डॉक्टर सुनील देशमुख यांच्या वक्तव्याला खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी प्रत्युत्तर दिले. खा. बोंडे म्हणाले की, डॉ. बाबासाहेबांना मानणारा वर्ग हा वाचणारा वर्ग आहे,एडतकरांनी आताच असे सांगितले खरे पण डॉ. बाबासाहेब यांनी लिहिलेले पुस्तकही वाचली पाहिजेत. त्यांच्याकडे व डॉक्टर देशमुख यांच्याकडे पुस्तके नसतील तर ती पुस्तके पाठवण्याची व्यवस्था करून देतो. जे संविधान धोक्यात आहे, असे म्हणतात त्यांना अजूनही वाचणाची आवश्यकता आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भारतरत्न देण्यासाठी खूप उशीर केला, असे म्हणत खा. बोंडे यांनी टोले लगावले. अखेर खासदार बळवंत वानखडे यांनी मी जर संविधानावर बोललो तर ती वादविवाद स्पर्धा होईल, असे म्हणत या टोलेबाजीला बगल देत पूर्णविराम दिला.

# 'प्रहार' द्वारा आयोजीत चांदूरबाजार येथे 'शिवरत्न शेटे' यांचे व्याख्यान मोठ्या उत्साहात संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५चांदूर बाजार** – प्रहार जनशक्ती पक्षातर्फे महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पावन स्मृती जयंतीनिमित्त चांदुर बाजार येथे रविवारी दि १३/०४/२०२५ रोजी सायंकाळी ०६. वा प्रसिद्ध व्याख्याते शिवरत्न शेटे, सोलापूर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.प्रसिद्ध व्याख्याते शिवरत्न शेटे यांनी दीड तास शिवछत्रपती आणि बाबासाहेब यांच्यामधील सारखेपणा स्पष्ट केला. अनेक उदाहरणे देऊन स्पष्टीकरण दिले, येथे पुस्तके वाटप ठेवल्यामुळे बाबासाहेब वरून पाहत असतील त्यांना खूप आनंद होत असेल, असे ही त्यांनी म्हटले. त्यानंतर अध्यक्षीय भाषण मा. बच्चु कडू यांनी केले. त्यामध्ये त्यांनी महात्मा ज्योतिबा फुले व बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त सर्वच ठिकाणी जयंती साजरी व्हावी या बाबत स्पष्ट विचार मांडले, याच कार्यक्रमांमध्ये स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची पुस्तके भेट देण्यात आली त्यामध्ये सावित्रीबाई फुले सार्वजनिक वाचनालय ब्राह्मण वाडा थडी, संत गाडगेबाबा वाचनालय शिरसगाव कसबा, अहिल्याबाई होळकर वाचनालय चांदूरबाजार तसेच शालेय विद्यार्थ्यांना सुद्धा शालेय उपयोगी पुस्तके देण्यात आली.या कार्यक्रमांमध्ये प्रमुख पाहुने मा.



बच्चु कडू, नयनाताई बच्चू कडू , शिरसगाव बंड सरपंच नंदा वाकोळे, उपसरपंच रहाटे, संतोष कीटूकले उपस्थित होते. व्याख्यानाकरिता चांदूरबाजार व आजूबाजूच्या गावातून मोठ्या प्रमाणात नागरिक जमले होते. त्यामध्ये गजानन ठाकरे यांनी संचालन केले तालुकाप्रमुख संतोष किटूकले यांनी प्रास्ताविक करून कार्यक्रमाला सुरुवात झाली त्यानंतर डॉ. नयनाताई कडू यांनी कार्यक्रमाची रूपरेषा स्पष्ट केली.या कार्यक्रमाला स्पर्धा परीक्षेचे विद्यार्थी आवर्जून उपस्थित होते. कार्यक्रमामध्ये बुंदीचे लाडू आणि बिसलरी पाण्याची व्यवस्था केली होती. आभार प्रदर्शन घनश्यामजी पेठे विदर्भ संपर्कप्रमुख यांनी केले कार्यक्रमाचे नियोजन तालुका प्रमुख संतोष कीटूकले, भैय्यासाहेब कडू , दीपक भोंगाळे, रणजीत देशमुख, निलेश वाटाणे, पुष्पक खापरे, गजानन ठाकरे, प्रशांत देवताळे, स्टेला मॅडम, कविता कीटकले, मंजुषा बोडखे व प्रहार विद्यार्थी संघटनेचे विद्यार्थी व पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांनी व्यवस्थापन व नियोजन केले. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने नागरिक आणि प्रहार च्या पदाधिकाऱ्यांसह मोठ्याप्रमाणात कार्यकर्ते उपस्थित होते.

# निवडणुका येतात तेव्हा हिंदूंच्या घरांवर हल्ले होतात

## नवनीत राणा पश्चिम बंगालमध्ये जाऊन ममतांना भिडणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५भिवंडी(ठाणे)** – पश्चिमबंगालमधील मुर्शिदाबाद येथे वक्फ बोर्ड विधयेकावरुन हिंसाचार उफाळला असून केंद्रीय सुरक्षा दलही येथे तैनात करण्यात आले आहे. येथील हिंसाचाराच्या घटनेवरुन भाजप नेते मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना लक्ष्य करत आहेत. प्रशासनाकडून कारवाई होत नसल्यानेच येथील हिंसाचाराला बळ मिळाल्याचा आरोप प. बंगालमधील भाजप नेत्यांनी केला आहे. आता, भाजपच्या महिला नेत्या आणि माजी खासदार नवनीत राणा यांनी देखील ममता बॅनर्जी सरकारला लक्ष्य केले आहे. तसेच, आपण पश्चिम बंगालमध्ये जाऊन ममता बॅनर्जी यांना त्यांची जागा दाखवून देऊ, असेही राणा यांनी म्हटले आहे. नवनीत राणा भिवंडीतील बागेश्वर धाम मंदिरात आल्या असता त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. पुढे बोलताना त्यांनी म्हटले की, देशात हिंदुराष्ट्र बनवण्याचा संकल्प गुरुजींचा आहे, त्याला मदत करण्याची




भूमिका आमची आहे. धीरेंद्र शास्त्री महाराज जे काम करीत आहेत, हिंदू राष्ट्र म्हणून त्यांनी जो प्रण केला आहे, त्यासोबत आमच्या सारखे भक्त जोडले गेले आहेत. त्यांच्यासोबत लाखो भक्त, युवक, राजकीय लोक जोडली गेली आहेत. गुरुजींच्या या लढ्यात आम्ही त्यांच्यासोबत असल्याचेसांगण्यासाठी आणि त्यांचे आशीर्वाद घेण्यासाठी मी या ठिकाणी आले आहे, असे नवनीत राणा यांनी म्हटले. दरम्यान, यावेळी पश्चिम बंगालमधील हिंसाचाराच्या घटनांवरही त्यांनी भाष्य केले. पश्चिम बंगालमध्ये जाऊन आम्ही हिंदुत्ववादी ममता दीदींना त्यांची जागा दाखवून देऊ, असे नवनीत राणा यांनी म्हटले.पश्चिम बंगालमध्ये सत्तेवर आल्यापासून ममता दीदी यांनी हिंदूंवर अत्याचार केले आहेत. जेव्हा जेव्हा निवडणुका येतात तेव्हा हिंदूच्या घरांवर हल्ले केले जातात. जेणे करून हिंदुत्ववादी विचारांना रोखता येईल. हिंदुत्वाला विरोध करून एवढे वर्ष ममता दीदी सत्तेवर बसल्या आहेत. बांगलादेशातजसे हिंदूंना हाकलून दिले जाते, पश्चिम बंगालमध्ये ममता दीदीसुद्धा तसे करू पाहत आहेत. पण, आता देशात हिंदुत्व विचारांचे सरकार आहे. त्यामुळे, त्यांचा प्रयत्न अपयशी होणार आहे.

# २,५३६ लेकी ठरल्या 'भाग्यश्री' योजनेसाठी पात्रबालविकास विभागाचा पुढाकार

## मुलीच्या जन्मानंतर मिळणार ५० हजार रुपये

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

मुलींच्या जन्माचे स्वागत आणि त्यांना आर्थिक संरक्षण देण्यासाठी राज्य शासनाने माझी कन्या भाग्यश्री योजना सुरू केली. या योजनेत मुलीच्या जन्मानंतर ५० हजार रुपयांची आर्थिक मदत दिली जाते. या योजनेसाठी आतापर्यंत २ हजार ५३६ लाभार्थी पात्र ठरले आहेत. त्यापैकी २ हजार २०० कन्यांना लाभ देण्यात आला आहे. उर्वरित कन्यांना लाभ देण्याची प्रक्रिया सुरू आहे. एप्रिल २०१६ पासून राज्य शासनाने माझी कन्या भाग्यश्री योजना सुरू केली. मुलींचा जन्मदर वाढण्यासोबतच विविध सुधारणा घडवून आणण्यासाठी शासनाने ही योजना सुरू केली. ज्या कुटुंबात दोन मुली आहेत, त्यांनासुद्धा या योजनेचा लाभदेण्यात येतो. यामध्ये पहिल्या मुलीला २५ हजार तर दुसऱ्या मुलीला २५ हजार रुपये असा लाभ देण्यात येतो. माझी कन्या भाग्यश्री योजना संपूर्ण राज्यात सर्व गटांतील दारिद्र्य रेषेखालील म्हणजेच बीपीएल कुटुंबात जन्माला आलेल्या मुलींसाठी राबविण्यात येत




असून त्या अंतर्गत मुलीचा जन्म झाल्यापासून ती १८ वर्षे वयाची होईपर्यंत लाभ घेता येतो. माझी कन्या भाग्यश्री योजनेचा लाभघेण्याकरिता अर्जदार महाराष्ट्राचे – कायमस्वरूपी रहिवासी असणेगरजेचे आहे. योजनेंतर्गत आई आणि मुलीच्या नावाने बँकेत संयुक्त खाते उघडले जाते. यावर एक लाख रुपयांचा अपघात विमा आणि पाच हजार रुपयांचा ओव्हर ड्राफ्ट देखील उपलब्ध आहे.

# सरपंचपदासाठी २३, २४ एप्रिल रोजी आरक्षण सोडत

## नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती:**

जिल्ह्यातील सन २०२५ ते २०३० या कालावधीत सार्वत्रिक निवडणुकीद्वारे गठित होणाऱ्या ग्रामपंचायतींच्या सरपंचपदासाठीचे आरक्षण येत्या २३ आणि २४ एप्रिल २०२५ रोजी निश्चित केले जाणार आहे. यासाठी नागरिकांनी संबंधित तहसील कार्यालयात उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व १४ तालुक्यांमध्ये तालुकास्तरावर प्राधिकृत अधिकारी तथा तहसीलदारांमार्फत ही सोडत प्रक्रिया पार पडणार आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरिकांचा मागास प्रवर्ग (नामाप्र) या पदांसाठी महिला आरक्षणासह सरपंचपदाचे आरक्षण निश्चित केले जाईल.दि. २३ एप्रिल रोजी अमरावती, भातकुली, चांदूर रेल्वे, दर्यापूर, अचलपूर, धारणी, मोर्शी तसेच दि. २४ एप्रिल रोजी नांदगाव खंडेश्वर, तिवसा, धामणगाव रेल्वे, वरुड, अंजनगाव सुर्जी, चांदूर बाजार, चिखलदरा तहसील कार्यालय येथे दुपारी १२ वाजता संबंधित तहसील कार्यालयाच्या सभागृहात ही सोडत प्रक्रिया पार पडेल. उपविभागीय अधिकारी हे नियंत्रण अधिकारी म्हणून या सोडतीसाठी उपस्थित राहतील. संबंधित नागरिक आणि ग्रामपंचायत सदस्यांना या सोडतीसाठी उपस्थित राहावे असे आवाहन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केले आहे.

# रवी नगर परिसरात जुन्या वादातून हत्या

## हत्येतील आरोपी काही तासातच अटकेत





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

रवी नगर परिसरात मंगळवारी रात्री च्या सुमाराच जुन्या कारणावरुन तिन इसमांनी तिर्थ गजानन वानखडे याच्यावर घातक शस्त्रांनी प्राणघातक हल्ला करुन गंभीर रीत्या जखमी केले व उपचारा दरम्यान त्याचा मृत्यु झाला.

सदर गुन्ह्याच्या तपासात गुन्ह्यातील आरोपी हे घटनास्थळावरुन फरार झाल्याने त्यांचा त्यांचे राहते घरी तसेच इतरत्र शोध घेण्यात आला परंतु ते मिळुन आले नाही. वरुन नमुद आरोपी बाबत गोपनिय माहीती प्राप्त झाली की, गुन्ह्यातील तिन्ही आरोपी हे खंडेलवाल नगर अमरावती जंगल परीसरात लपलेले आहे. अशी माहीती प्राप्त झाल्याने ताबडतोब खंडेलवाल नगर परीसरात नमुद आरोपींचा शोध घेतला असता ते तिन्ही आरोपी नामे १) सुरज वसंतराव बघेकर वय ३६ वर्ष रा. अंबा विहार अम. २) चेतन विनोद पिंजरकर वय ३६ वर्ष रा. पटविपुरा अम. ३) रोशन विनोद पिंजरकर वय ४० वर्ष रा. पटविपुरा अम. यांना शस्त्रासह खंडेलवाल नगर परीसरातुन ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्यांनी सदरचा गुन्हा हा जुन्या वादातुन केला असल्याचे सांगुन सदर गुन्ह्याची कबुली दिली. पुढील तपास राजापेठ पोलीस करीत आहे.सदरची कार्यवाही नविनचंद्र रेड्डी, पोलीस आयुक्त अमरावती शहर, गणेश शिंदे, पोलीस उपायुक्त परि.२ अम., सहा. पोलीस आयुक्त जयदत्त भवर, व.पो.नि. पुनित कुलट यांच्या मार्गदर्शनात क्रिमीनल इंन्टेलीजन्स युनिट मधील प्रभारी स.पो.नि. महेन्द्र झंळे, स. फौ. विनय मोहोड , पो.हे.का. सुनिल लासुरकर, जहीर शेख, ना.पो.शि. अतुल संभे, पो.शि. राहुल देंगेकर, विनोद काटकर यांनी केली आहे.

# मोफत साडी वाटपाला महाराष्ट्र दिनाचा मुहूर्त

## ‘अंत्योदय’च्या १.२८ लाख लाभार्थींना रेशन दुकानातून मिळणार लाभ


**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**




जिल्ह्यातील १.२८लाख अंत्योदय कार्डधारकांना यावेळी होळीला मोफत साडी मिळालेली नाही. मात्र, अन्य जिल्ह्यात साड्यांचे वितरण झाले. त्यामुळे जिल्ह्यातील लाभार्थीमध्ये नाराजी होती. अखेर काही तालुक्यांमधील गोदामात साड्या उपलब्ध झाल्या आहेत. त्यामुळे १ मे या महाराष्ट्र दिनापासून वाटपाचा मुहूर्त असल्याची माहिती आहे.गेला वर्षी लोकसभानिवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील १,२८,२१२ अंत्योदय रेशन कार्डधारकांना प्रत्येकी एक साडी मोफत देण्यात आली होती. तसेच दरवर्षी एक मोफत साडी या लाभार्थी कुटुंबांना देण्यात येईल, असे शासनाने स्पष्ट केले होते. प्रत्यक्षात यावर्षी होळी आटोपली तरी रेशन दुकानातून साडी मिळालेली नव्हती. प्रत्यक्षात काही जिल्ह्यांत मात्र रेशनदुकानांतून मोफत साड्यांचे वितरण करण्यात आल्याने जिल्ह्यातील नागरिकांमध्ये नाराजीचा सूर होता.आता मात्र काही तालुक्यांतील गोदामात साड्यांचा पुरवठा झालेला आहे. शिवाय, अन्य तालुक्यांतदेखील पुरवठा होणार असल्याची माहिती जिल्हा पुरवठा विभागाने दिली.

# विराटचा फॅन परतवाड्याच्या सुजल गुर्जरची राज्यभरात चर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**



आयपीएल २०२५ मधील २८ वा सामना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) आणि राजस्थान रॉयल्स (आरआर) संघात रविवारी जयपूरच्या सवाई मानसिंग स्टेडियमवर दुपारी २.३० वाजता झाला. या सामन्यादरम्यान परतवाडा येथील सुजल गुर्जर हा विराट कोहलीचा चाहता आहे. सुजलने विराटला भेटण्यासाठी अचानक मैदानाच्या आत प्रवेश केला. तो धावत येत असताना बघून कोहली काहीसा घाबरलेला दिसला. या दरम्यान सुरक्षा रक्षकांनी सुजलला रोखून मैदानाबाहेर नेले. चाहते आवडत्या स्टार क्रिकेटपटूंना भेटण्यासाठी कोणतेही दिव्य करण्यास तयार असतात, हेच या घटनेतून पुन्हा सिद्ध झाले. –

आरसीबीने ९ विकेट्सने दमदार विजय – मिळवला. परंतु, या विजयानंतर एक अनपेक्षित प्रसंग घडला. या घटनेने सर्व क्रिकेटप्रेमींचे लक्ष वेधून घेतले. आरसीबीचा स्टार फलंदाज विराट कोहली सामना संपल्यानंतर राजस्थान रॉयल्सचे मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड,विराट कोहलीला भेटण्यासाठी मैदानात शिरलेला परतवाडा येथील सुजल गुर्जर,फलंदाजी प्रशिक्षक विक्रम राठोड आणि फ्याट्राज यशस्वी जयस्वाल, गोलंदाज भुवनेश्वर कुमार यांच्याशी चर्चा करत होता. याचवेळी सुजल गुर्जर अचानक मैदानावर घुसला आणि थेट कोहलीकडे धावत आला.सुरक्षेचा भंग करत आलेल्या या चाहत्याकडे पाहून कोहली काहीसा घाबरला. तसेच त्याच्यापासून दूर जाण्याचा प्रयत्न करत टाळाटाळ करताना दिसून आला. या घटनेचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

# भारतरत्न डॉ बाबासाहेब जयंती निमित्त तुषार भारतीय यांनी केले अभिवादन!

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**



महामानव बोधिसत्व भारत रत्न बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने संपूर्ण शहर भीममय झाल होत. अनेक ठिकाणी बाबासाहेबांच्या विचारच उदबोधन झाल ठिकठियाणाहून मेनबत्ती रॅली, मोटर सायकल रॅली चे आयोजन करण्यात आले.अकोली मधून निघालेल्या भव्य रेलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅली चे स्वागत माजी स्थायीसमिती सभापती, माजी भाजपा सभागृह नेते तुषार भारतीय, माजी महापौर चेतन गावंडे यांनी केले या वेळी महामानवाच्या प्रतिमेला हर्रापण करून मानवंदना दिली. या वेळी बंदीचे लाडू वाटण्यात आले. महामानवाच्या दिलेल्या विचारावर नागरिकांनी चालल्यास भारत देश जगाचे नेतृत्व करेल तसेच आपसातील मतभेद दूर करून एकसंघ समाज करण्याची शपथ आजच्या दिवशी घेण्याची आवश्यकता आहे असे विचार तुषार भारतीय यांनी मांडले.यावेळी माजी महापौर चेतन गावंडे, देवा शेंडे, जितेंद्र नाईक. माजी सैनिक श्री गायकवाड, शुभम वैष्णव राजेश जगताप मंदार नानोटी,विजय गावंडे , जितेश नाईक , विठ्ठलराव साखरे , विलास राठोड , नरेंद्र सोळके , राजेश टोबरे , अरुण चवरे , गजानन फुटाणे , सुयोग मेश्राम ,गजानन वर्धे , नरेश खानझोडे , राजेंद्र पवार , सौ वंदना टोबरे , सौ पद्मा खानझोडे , शुभांगी नाईक , सरिता राठोड, करण मोंढे शुभम चतुर आकाश वंजारी ऋषभ शर्मा अमित दहीकर शुभम बेलपत्रे संदीप गॅडलिग सुमित दहीकर आकाश राऊत समीर थोरात उपस्थित होते.

# पी.आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी मेळावा संपन्न

## कोणत्याही क्षेत्रात काम करत असताना आपले अस्तित्व निर्माण करा – प्रविण पोटे पाटील

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५ अमरावती**





पी.आर. पोटे पाटील अभियांत्रिकी आणि व्यवस्थापन महाविद्यालय, अमरावती चा माजी विद्यार्थी मेळावा महाविद्यालयातील स्वामी विवेकानंद ऑडिटोरिअम येथे नुकताच आयोजित करण्यात आला होता, पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे हजारो विद्यार्थी विदेशात तसेच देशात दिल्ली, पुणे, मुंबई, बंगलोर, हैद्राबाद, नागपूर येथे विविध सॉफ्टवेअर व कोअर कंपनी मध्ये उच्च पदावर कार्यरत आहेत, महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांकरिता त्यांच्या वर्गमीत्रांशी पुन्हा मनोमिलन होण्यासाठी आणि त्यांचे व्यावसायिक देवाणघेवाण करण्यासाठी एक व्यासपीठ महाविद्यालयाच्या वतीने या माजी विद्यार्थी मेळाव्याच्या निमित्ताने उपलब्ध करण्यात आले. या विद्यार्थी पुनर्मिलनामध्ये महाविद्यालयाच्या स्थापने पासून तर आज पर्यंतच्या पदवीधरांचा समावेश होता, ज्यामुळे त्यांना सर्व उपस्थितांसाठी एक संस्मरणीय अनुभव सुनिश्चित करून हा कार्यक्रम महाविद्यालयाच्या अल्युमिना असोसिएशन च्या वतीने आयोजित करण्यात आला. विविध कंपनीमध्ये उच्च पदावर असणारे कंपनीचे सीईओ,संचालक, आयटी मॅनेजर, नेटवर्क ऍडमिनिस्ट्रेटर, डेटाबेस ऍडमिनिस्ट्रेटर, सिस्टीम ऍनालिस्ट, डेव्हलपर , प्रोडक्ट मॅनेजर, सिस्टम आर्किटेक्ट, सर्व्हिस इंजिनिअर अश्या अभियांत्रिकी , एमबीए, एमसीए ३०० पेक्षा जास्त माजी विद्यार्थ्यांनी या मेळाव्याला उपस्थिती दर्शवली.

कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष प्रवीण पोटे पाटील आणि उपाध्यक्ष श्रेयसदादा पोटे पाटील यांच्या हस्ते तसेच संचालक डॉ पी. एम. खोडके , प्रा. मोनिका जैन हेड कॉर्पोरेट रिलेशन , प्राचार्य डॉ पी. एम. जावंधिया, उपप्राचार्य डॉ मो. झुहेर, सर्व महाविद्यालयाचे डीन्स , सर्व विभाग प्रमुख यांच्या उपस्थितीत करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात पारंपारिक दीप प्रज्वलनाने झाली. त्या नंतर कार्यक्रमची रूपरेषा आणि महाविद्यालयाचा आढावा माहिती पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. एम जावंधिया यांनी उपस्थितांना दिली.

माणूस जगाच्या पाठीवर कुठेही गेला आणि कितीही मोठा झाला तरी त्याच्या महाविद्यालयाशी असलेला ऋणानुबंध तुटत नाही. माजी विद्यार्थी मेळाव्याच्या निमित्तानं जुने सवंगडी भेटतात आणि जुन्या आठवणींना आपसूक उजाळा मिळतो असे प्रतिपादन पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप चे संचालक डॉ पी. एम. खोडके यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत केला.

सोबतच संस्थेचे अध्यक्ष माजी राज्यमंत्री श्री प्रवीण पोटे पाटील यांनी या प्रसंगी येणाऱ्या काळातील रोजगार आणि त्याकरिता लागणाऱ्या माजी विद्यार्थ्यांचे सहकार्य किती आवश्यक आहे याबद्दल संवाद साधला तसेच आयुष्यात खूप मोठे व्हा आपल्या आई वडिलांसोबत महाविद्यालयाचे नाव देशात मोठे करा त्याचप्रमाणे कोणत्याही क्षेत्रात काम करत असताना आपले अस्तित्व निर्माण करा असे मनोगत यावेळी त्यांनी व्यक्त केले तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी आज नामांकित कंपनीमध्ये उच्च पदावर लाखोंच्या पॅकेजमध्ये कार्यरत आहेत याचा अभिमान पी. आर. पोटे पाटील ग्रुप ला असल्याचा यावेळी आपल्या शब्दातून श्री प्रवीण पोटे पाटील यांनी व्यक्त केला.

सर्व माजी विद्यार्थी एकत्र आल्यानंतर सर्वांनी आपला परिचय दिल्यावर शिक्षण घेत असतानाच्या काही गमतीदार आणि काही चांगल्या आठवणींना उजाळा दिला यात एकत्रितपणे केलेला अभ्यास, शिक्षकांचा विद्यार्थ्यांवरील वचक, शाळेतील क्रीडा स्पर्धा, शिक्षकांनी दिलेली अनमोल मार्गदर्शन, स्नेहसंमेलन आणि त्यातील सांस्कृतिक कार्यक्रमाची धूम , महाविद्यालयाचे विदेश दौरा अशा विविध विषयांवर चर्चा करण्यात आली तसेच माजी विद्यार्थ्यांनी या प्रसंगी आपले मनोगत व्यक्त करत महाविद्यालयाप्रती आपले प्रेम व्यक्त केले.

# अचलपूर जलसंपदा विभागात जलव्यवस्थापन कृती पंधरवाडा शुभारंभ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**



जलसंपदा विभागाच्या वतीने मध्यम व लघु पाटबंधारे विभाग अचलपुर येथे दिनांक १५ एप्रिल २०२५ ते ३० एप्रिल २०२५ दरम्यान जलव्यवस्थापन कृती पंधरवाडा अतर्गंत जलव्यवस्थापन कृती पंधरवडयाचा शुभारंभ झाला आहे. जलव्यवस्थापन कृती पंधरवाडा माध्यमातुन पाण्याच्या सुयोग्य वापराबाबत जनजागृती वाढविणे या लोकाभिमुख उपक्रमात सर्व यंत्रणा व घटकांनी सक्रिय सहभाग घ्यावा असे आवाहन जलसंपदा विभागाने केले आहे.कार्यकारी अभियंता श्रीकांत गु. उमप यांनी जल पुजन, कलश पुजन करत सुरुवात केली आहे. अचलपुर जलसंपदा विभागात या जलव्यवस्थापन कृती पंधरवाडा माध्यमातुन जल साक्षरता वाढविणे, पाण्याचा योग्य वापर कसा करावा या बाबत जन जागृती करणे आणि उपाय योजना करणे अपेक्षित आहे. तसेच अनधिकृत पाणी रोखणे, सांडपाण्याचा पुर्णवापर करणे या उपाययोजना केल्या जातील त्याचप्रमाणे नागरीकांना पाण्याचे महत्व आणि जल व्यवस्थापन शिवाय पाण्याचा योग्य वापर कसा करावा या बाबत जनजागृती करण्यात येत आहे. तसेच जल साक्षरता वाढविणे आणि ते लोकाभिमुख करुन सर्व यंत्रना व घटकांनी यामध्ये सहभाग दर्शवावा असे आवाहन अचलपुर विभागाने केले आहे.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री. विशाल मोहोड यांनी केले असुन यांनी जल प्रतिज्ञेचे वाचन करीत कार्यक्रमाची सांगता केली. सदर कार्यक्रमास जलसंपदा विभागातील सर्व अधिकारी/ कर्मचारी उपस्थित होते.

# जिजाऊ रथ यात्रेचे अमरावती शहरात गुरुवारी आगमन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५चांदूर रेल्वे**

मराठा सेवा संघ व कक्षांद्वारा १४ मार्चपासून राज्यातील विविध जिल्ह्यातून निघालेली जिजाऊ रथ यात्रा गुरुवार, १७ एप्रिलला चांदूर रेल्वे येथे पोहोचणार असून, तेथून ती अमरावतीकडे रवाना होणार आहे. अमरावती मध्ये या रथाचे जोरदार ऐसे स्वागत करण्यात येणार आहे.चांदूर रेल्वेत सर्व समविचारी संघटनांच्या वतीने या रथयात्रेचे भव्य स्वागत करण्यात येणार आहे. एकूण ४५ दिवसांच्या रथयात्रेचा उद्देश हा मराठा समाजात जागृती निर्माण करणे, समाज संघटनेची घडी नीट बसवणे, महिला युवक शेतकऱ्यांचे प्रश्न हाताळणे. आपल्या संविधानात्मक जबाबदाऱ्या समजून घेत, सध्या समाजामध्ये निर्माण केले जात असलेले असलेले संशयाचे वातावरण दूर करून सर्व समाजात सामजिक एकताव सद्भावना निर्माण करत दंगलमुक्त महाराष्ट्र घडवणे हा आहे. १७एप्रिलला दुपारी ४ वाजता येथील विस्ळ चौक येथे व जुना बसस्टँड येथे या रथयात्रेचे स्वागत होणार असल्याचे राजू वडतकर, हेमंत टाले यांनी सांगितले आहे. समाजबांधवांनी यात सहभागी होण्याचे आवाहन संभाजी ब्रिगेडचे तालुका अध्यक्ष अनुप अवघते यांनी केले आहे.त्यानंतर जिजाऊ रथ यात्रेचे अमरावती शहरात आगमन होणार आहे.

# बडनेरा नरखेड या रेल्वे मार्गावरील मेमू ट्रेनमध्ये प्रवाशांचे हाल

## मालगाडीला प्राधान्य प्रवासी बसतात ताटकळत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

भुसावळ आणि नागपूर रेल्वे मंडळामध्ये येत असलेला बडनेरा नरखेड हा रेल्वे मार्ग प्रवाशासाठी जीवघेणा ठरला असून मालगाडी सोडण्यास प्रथम प्राधान्य तर प्रवाशांना मात्र तासंतास रेल्वे सुटण्यासाठी वाट बघावी लागत असल्याने प्रवाशाचे प्रचंड हाल होत आहे विशेषता या प्रवासी गाडीमध्ये नरखेड पासून तर चांदूरबाजार पर्यंत अमरावतीला जाण्यासाठी प्रवासांची चढ-उतार चालू असते यामध्ये अनेक रुग्ण तसेच वृद्ध व बाल महिला यांची भरमार असते परंतु प्रथम प्राधान्य मालगाडीला दिल्याने दोन तास तीन तास कधीकधी तर आठला पोहोचणारी गाडी मध्यरात्रीपर्यंत पोहोचत असल्याने अनेकांना




बडनेरावरून मुंबईकडे जाण्यासाठी आरक्षित केलेल्या रेल्वेतील जागाही सोडाव्या लागतात त्यामुळे प्रवाशांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागतो कधीकाळी माजी पंतप्रधान पी व्ही नरसिंहराव यांनी नरखेड ते अमरावती हा रेल्वे मार्ग प्रवाशांच्या सोयीसाठी व या परिसरातील शेतकऱ्यांसाठी निर्माण केला होता परंतु या मेमो ट्रेनमध्ये प्रवास करताना प्रवाशांना मात्र आपण कधी आपल्या ठिकाणावर पोहोचू याची हमी नसल्याने प्रवाशांवरही त्याचा मोठा परिणाम झाला आहे परिणामी रेल्वे उशिराने सोडल्याने आर्थिक फटकाही बसत आहे नागपूर या परिमंडळामध्ये नरखेड ते मोर्शी इथपर्यंत भाग देखरेखी खाली येतो तर चांदूरबाजार ते बडनेरा हा भाग भुसावळ या परिमंडळात येतो सकाळी पहिल्यांदा सुटणारी गाडी क्रमांक ६१ ० ३ बडनेरा नरखेड ..गाडी.क्रमांक ६१ १०४ नरखेड बडनेरा.. गाडी क्रमांक ६१ १० ५ बडनेरा नरखेड ..गाडी क्रमांक ६१ १० ६ नरखेड... बडनेरा अशा या मेमो ट्रेनच्या फेरीचा प्रवास असून कधीही गाड्या वेळेवर पोहोचत नसल्याने

### लोकप्रतिनिधीचे दुर्लक्ष कायम

अमरावती नरखेड हा रेल्वे मार्ग तीन लोकसभा मतदारसंघात येत असून चार विधानसभा मतदारसंघ संघात विखुरला आहे येथील लोकसभेचे अमरावती मधून प्रतिनिधी बळवंतराव वानखेडे खासदार आहेत तर वर्धा या मतदार संघातील लोकप्रतिनिधी अमर भाऊ काळे हे आहेत तर नागपूर मधून नरखेड तालुक्यात लोकप्रतिनिधी हे श्याम बर्वे आहेत तर आमदार म्हणून चरण सिंग ठाकूर आहेत या लोकप्रतिनिधींनी जर या रेल्वे मार्गाकडे व प्रवाशांच्या जीव घेण्या प्रवासाकडे लक्ष दिले तर मेमू ट्रेन या वेळापत्रकाप्रमाणे थाऊ शकतात पण रेल्वेच्या अधिकाऱ्यांना कोणीच बोलणारे व विचारणारे नसल्याने रेल्वेच्या अधिकाऱ्यांचा रेल्वे सोडण्याचा मनमानी कारभार असा सुरू राहणार असल्याची चर्चा जनमानसात आहे.

प्रवाशांना गाडीमध्येच तात्काळत बसावे लागते विशेषता उन्हाळ्याचे दिवस असल्याने व उष्णतामान तीव्र असल्याने या उन्हाचा फटकाही प्रवाशांना लहान मुलांना तसेच वृद्ध व रुग्णांना बसत असल्याने रेल्वे पेक्षा आपली एसटीच बरी असे म्हणण्याची वेळ प्रवाशांवर आली आहे संबंधित रेल्वेचे अधिकाऱ्यांनी मालगाडी वाहतुकीपेक्षा प्रवाशांना प्राधान्य दिल्यास प्रवाशांच्या सोयीचे होईल अन्यथा नरखेड बडनेरा हा रेल्वे मार्ग फक्त मालगाडी वाहतुकीसाठी च आहे का? असा प्रश्न निर्माण झाला असून.मेमो ट्रेन बंद करून टाकाव्यात म्हणजे प्रवाशांना त्रास होणार नाही अशी चर्चा आता होऊ लागली आहे प्रवाशांनी पुढील आंदोलनाची दिशा ठरवण्याची चर्चा जनमानसात आहे .

# खामगाव-नांदुरा रस्त्यावर ट्रक आणि बसच्या धडकेत तिघांचा मृत्यू

## सुमारे २० जण जखमी; सर्व जखमींवर अकोला रुग्णालयात उपचार सुरू



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५खामगाव**

खामगाव-नांदुरा रस्त्यावर ट्रक आणि खाजगी बसच्या धडकेत तीन जणांचा मृत्यू झाला आहे. या अपघातात सुमारे २० जण जखमी झाले आहेत. गंभीर जखमी झालेल्या तिघांना अकोला येथे उपचारासाठी पाठवण्यात आले आहे.

बुलढाणा येथे एक भीषण रस्ते अपघात झाला आहे. मंगळवारी सकाळी मध्य प्रदेश परिवहन महामंडळाची बस आणि ट्रकमध्ये ही भीषण टक्कर झाली. या अपघातात ३ जणांचा मृत्यू झाला आहे. तर २० हून अधिक जण गंभीर जखमी आहेत. सर्व जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, जिथे त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. या घटनेनंतर संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

या संबंधी मिळालेल्या अधिक माहितीनुसार बुलढाणा येथील खामगाव-नांदुरा रस्त्यावर हा अपघात झाला. येथे मध्य प्रदेश परिवहनची बस अचानक एका ट्रकला धडकली. ही टक्कर इतकी भीषण होती की ट्रक आणि बसच्या पुढच्या भागांचा चक्काचूर झाला. या अपघातात तीन जणांचा मृत्यू झाला आहे. बसमधील २० प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. सर्व जखमींना अकोला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# माजी मंत्री वसंत पुरके यांनी घेतला शहर कांग्रेसचा आढावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे नवनियुक्त अध्यक्ष श्री.हर्षवर्धनजी सपकाळ यांच्या आदेशानुसार,राज्याचे माजी शिक्षण मंत्री श्री.वसंतराव पुरके यांनी आज १५ एप्रिल २०२५ रोजी अमरावतीचे निरीक्षक म्हणून शहर काँग्रेसच्या मुख्य कार्यालयात अमरावती शहर काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक घेतली.त्यांनी उपस्थित काँग्रेस सदस्यांना सांगितले की,२०१४ पासून सत्तेत असलेल्या काही स्वार्थी लोकांनी देशाच्या राजकारणाचे मन खराब केले आहे,परंतु आजही काँग्रेस आपल्या धर्मनिरपेक्ष विचारसरणीवर ठामपणे उभी आहे.काँग्रेसने त्यांच्या दीर्घ राजकीय प्रवासात अनेक चढ-उतार पाहिले आहेत आणि त्यांना विश्वास आहे की हा टप्पाही बदलेल आणि काँग्रेस पुन्हा एकदा देशात सत्तेवर येईल. म्हणून प्रत्येक काँग्रेसजनाने काँग्रेस सोबत निष्ठेने उभे राहिले पाहिजे असे ते यावेळी म्हणालेत.

यावेळी व्यासपीठावर शहराध्यक्ष बबलू शेखावत,माजी पालकमंत्री डॉ.सुनील देशमुख, माजी महापौर विलास इंगोले,



माजी महापौर मिलिंद चिमोटे, माजी महापौर अशोक डोंगरे, माजी महापौर वंदना कंगाले, प्रदेश सरचिटणीस किशोर बोरकर, प्रदेश पदाधिकारी भैय्या पवार, महिला काँग्रेसच्या शहराध्यक्षा जयश्री वानखड़े, कोशाध्यक्ष आनंदबाबू भामोरे, माजी शहराध्यक्ष संजय अकरते,नसीम खान पप्पू उपस्थित होते.यावेळी माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख म्हणाले की, विजय आणि पराजय हा राजकारणाचा एक महत्त्वाचा भाग आहे.भाजपने देशातील वातावरण हिंदू-मुस्लिम मुद्द्यावर विभागले आहे,आज कुठलाही भाजप नेता हिंदू-मुस्लिम मुद्द्यांशिवाय विचार करू शकत नाही.या प्रसंगी,विदर्भ मतदारचे संपादक ॲड.दिलीपबाबू एडतकर,माजी महापौर विलास इंगोले,नसीम पप्पू,शहर महिला काँग्रेस अध्यक्षा जयश्री वानखडे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सलीम मिरावाले यांनी कार्यक्रमाचे संचालन केले आणि आभार मानले.यावेळी शहर काँग्रेसचे संजय वाघ, डॉ.मतीन अहमद,डॉ.अंजली ठाकरे,माजी नगरसेविका शोभा शिंदे,हाजी नजीर खान,सादिक शहा,अब्दुल रफिक पत्रकार,सुनील पडोळे,गजानन रडके,पंकज मेश्राम,सुरेश इंगळे,संजय बोबडे,विजय राठोड,निजाम भाई,लखन यादव,बी.टी.अंभोरे, प्रकाश पहूरकर,निलेश गुहे,वैभव देशमुख,अभिनंदन पेंढारी,आसमां परवीन,अतुल काळबांडे,विजय खंडारे, पंकज मेश्राम,वंदना थोरात,कीर्तिमाला विजय चौधरी,गणेश भोरे,दीपक हुंडीकर,विजय बर्वे,प्रदीप अरबट,प्रदीप शेवतकर,प्रशांत महल्ले,रवींद्र शिंदे,श्याम देशमुख,राजेंद्र देशमुख,अरुण रामेकर,अनिल देशमुख,गजानन सासनकर,सतीश माहोरे,गजानन राजगुरे,विजय खंडारे,संदीप मानकर,अनिल तायडे,माणिक लोखंडे,प्रकाश वानखडे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# प्रकल्पबाधितांना अनुदान देण्यापूर्वी घेणार न्यायालयात दाद न मागण्याचे शपथपत्र

## शपथपत्राशिवाय ती रक्कम मिळणार नाही, प्रकल्पबाधितांमध्ये संभ्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

शासनाला मदत व्हावी व शेतशिवार सिंचनाने जलसमृद्ध व्हावे, यासाठी जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांनी आपली ७,२९१ हेक्टर जमीन सरळ खरेदी पद्धतीने अतिशय अल्पमोबदल्यात शासनास दिली होती. त्यांना आता पाच लाख रुपये प्रतिहेक्टर सानुग्रह अनुदान दिले जाणार आहे. १६ एप्रिल रोजी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते त्या वितरणाचा प्रातिनिधिक आरंभ होणार आहे. मात्र त्यासाठी प्रकल्पबाधितांना सानुग्रह अनुदान मिळाल्यानंतर आपण वाढीव मोबदला मिळण्यासाठी कोणत्याही न्यायालय किंवा प्राधिकरणाकडे जाणार नाही, कुठेही दाद मागणार नाही, असे शपथपत्र



देणे बंधनकारक करण्यात आले आहे.

जेलरोडस्थित अमरावती प्रकल्प बांधकाम विभाग क्रमांक १ या कार्यालयात तसा अर्जनमुना लावण्यात आला आहे. शपथपत्राशिवाय ती रक्कम मिळणार नाही, अशी तजवीज केल्याने प्रकल्पबाधितांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. नोटीस बोर्डवर लावलेला तो नमुना अर्ज, त्यातील अटी पाहता हे तर प्रकल्पबाधितांचे हात कलम करणे होय, अशी संतप्त प्रतिक्रिया उमटली बाधितांमध्ये उमटली आहे. नियामक मंडळाच्या पत्रात अट नाही. त्यामुळे अमरावती प्रकल्प बांधकाम विभागाची भूमिका संशयास्पद ठरली आहे.

पेढी प्रकल्पाला शेतकऱ्यांचा तीव्र विरोध होता. त्यामुळे अधिकाऱ्यांनी काहींना हाताशी धरून भूसंपादन कायद्याऐवजी खासगी वाटाघाटीद्वारे सरळ खरेदी पद्धतीने भूसंपादन केले होते. त्यावेळी देखील त्या अल्प मोबदल्याविरोधात न्यायालयात दाद मागणार नाही, असे शपथपत्र घेऊन जलसंपदा विभागाने प्रकल्पबाधितांचे हात कलम केले होते. त्यांना नैसर्गिक न्यायापासून वंचित ठेवले होते.

> याआधीदेखील प्रकल्पबाधितांचे संवैधानिक अधिकार हिरावून घेण्यात आले होते. मात्र आता तसे होणार नाही. ती अट काढण्यासाठी विदर्भपाटबंधारे विकास महामंडळाला पत्र दिले आहे.
>
> **– मनोज चव्हाण, अध्यक्ष, विदर्भ बळीराजा संघटना**

> त्या जमिनी खासगी वाटाघाटीद्वारे घेण्यात आल्या होत्या. त्यांना न्यायालयातून मोबदला मिळणार नाही, म्हणूनच आम्ही सानुग्रह अनुदान देत आहो. ती अट वकिलांच्या सूचनेनुसार टाकण्यात आली.
>
> **– राजेश सोनटक्के, कार्यकारी संचालक**

### अमरावती प्रकल्प बांधकाम विभागात लावला 'बंच'

पाच लाख रुपये सानुग्रह अनुदान पाहिजे असेल, तर १२ दस्तावेज सोबत जोडावेत, अशी सूचना अमरावती प्रकल्प बांधकाम विभागात लावण्यात आली आहे. तेथे नमुना अर्ज, करारनामा, प्रतिज्ञालेखाचा नमुना वजा फत्वा देखील लावण्यात आला आहे.

# ट्रक व पोलीस वाहनाच्या अपघातात दुचाकीस्वार ठार एक गंभीर जखमी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५ तिवसा**

तिवसा तालुक्यातील राष्ट्रीय महामार्गावर आज सकाळच्या सुमारास भीषण अपघात झाला असून यामध्ये एका युवकाचा मृत्यू झाला आहे. पोलिसांच्या वाहनावर दुचाकी आदळल्याने ही दुर्घटना घडली. मोझरी ते तिवसा राष्ट्रीय महामार्गावर, आज सकाळी एक गंभीर अपघात घडला.जितू अळसपूरे आणि नामदेव ठाकरे, दोघे रा. तिवसा, हे दुचाकीवरून मोझरीहून तिवसाकडे जात होते.याचदरम्यान, नवीन बायपास रोडवरून येणारा एक ट्रक थेट समोरून येणाऱ्या पोलीस वाहनाला धडकला.या अचानक झालेल्या धडकेत, मागून येणारी दुचाकी पोलीस वाहनावर आदळली, आणि अपघात गंभीर बनला.या अपघातात जितू अळसपूरे गंभीर जखमी झाले होते. तातडीने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले,मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.तर नामदेव ठाकरे यांच्यावर अद्याप उपचार सुरू आहेत आणि त्यांची प्रकृती नाजूक आहे.घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून, वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती.स्थानिक पोलीस घटनास्थळी दाखल होऊन वाहन हटवून रस्ता मोकळा केला.अपघाताचा अधिक तपास सुरू आहे.या अपघातात पोलीसांचे वाहनाचे सुद्धा मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.





# खते, बियाणे उपलब्धतेसाठी काटेकोर नियोजन करावे - आ प्रताप अडसड

## खरीप हंगाम पूर्व नियोजन आढावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५ धामणगाव रेल्वे**

आगामी खरीप हंगाम लक्षात घेता बियाणे, खते, कीटकनाशके आदी निविष्ठा सर्वत्र उपलब्ध असण्याच्या दृष्टीने परिपूर्ण नियोजन करा, तसेच कोणत्याही परिस्थितीत खते, बियाणे यांची टंचाई भासणार नाही याबाबतची दक्षता घ्यावी, असे निर्देश आ प्रताप अडसड यांनी दिले.

स्थानिक पंचायत समिती भवनात खरीप हंगाम आढावा बैठकीत आ श्र.अडसड बोलत होते. बैठकीलाकृषी उपविभागीय अधिकारी डॉ पंकज चेडे ,शेतकरी राधेश्याम मुंधडा,नायब तहसीलदार आशिष विर आत्माचे जयंत बमनोटे,भाजपा तालुका अध्यक्ष मनोज डहाके, प स सहाय्यक गट विकास अधिकारी मसतकर उपस्थित होते.

आ प्रताप अडसड म्हणाले, खरीप हंगामामध्ये बियाणे आणि खतांचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर जाणवतो. त्यामुळे या




दोन्हीचे नियोजन आवश्यक आहे. पिक पेरणी क्षेत्राला आवश्यक असणाऱ्या बियाण्यांची उपलब्धता होण्यासाठी कृषी विभागाचे नियोजन महत्त्वाचे ठरणार आहे. गुणनियंत्रण विभागाने दक्ष राहून बोगस बियाणे, खतांची विक्री होणार नाही याबाबतची दक्षता घ्यावीखरीप पीक हंगामासाठी शेतकऱ्यांना कर्जपुरवठा सुरळीत झाला पाहिजे. एकही शेतकरी पीक कर्जापासून वंचित राहणार नाही याबाबत दक्षता घ्यावी. पीक कर्जाचे देण्यात आलेले उद्दिष्ट पूर्ण करापिक विमा योजनेचा शेतकऱ्यांना फायदा होण्यासाठी प्रशासकीय यंत्रणेने लक्ष देण्याची गरज आहे. असल्याचे आ प्रताप अडसड यांनी सांगितले. पोखरा अंतर्गत असलेल्या गावात आराखडे तयार करण्यासाठी ग्रामस्थानी पुढाकार घ्यावा असेही आवाहन आ अडसड यांनी केले या आढावा बैठकीत तालुक्यातील सरपंच, उपसरपंच, शेतकरी दुय्यम निबंधक विभागाचे अधिकारी उपस्थित होते प्रास्ताविक तालुका कृषी अधिकारी गजाननराव त्यांनी केले

### कृषी सहाय्यकांचे पद भरणार

तालुक्यात सर्वाधिक कृषी सहाय्यकाचे पद रिक्त आहे हे पद भण्यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करणार आहे कर्मचार्यांनी वेळापत्रकानुसार गावात उपस्थित रहावे शेतकऱ्याच्या तक्रारी येऊ नये याची दक्षता कर्मचार्यांनी घ्यावी अश्या सूचना आ प्रताप अडसड यांनी दिल्या